ग्रंथमालिका ‘धर्माचरण’ : खंड २

# विवाहसंस्कार

## (शास्त्र आणि सध्याच्या अयोग्य प्रथा)

मराठी (Marathi)


संकलक

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**



सनातन संस्था


हा लघुग्रंथ स्वतः वाचा अन् इतरांनाही वाचण्यासाठी द्या !


प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या १,000 प्रती आणि या
लघुग्रंथाच्या आतापर्यंत ५४ सहस्र ८00 प्रती प्रकाशित !

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्‌घोष (वर्ष १९९८)

३. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : यानुसार साधना करून २०.९.२०२४ पर्यंत १२८ साधक संत झाले, तर १,०४३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू !

४. ग्रंथ-निर्मिती : ऑक्टोबर २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत९७ लाख ७२ सहस्र प्रती आणि ५,००० हून अधिक ग्रंथ होतील एवढे लिखाण प्रकाशित होण्याच्या प्रतीक्षेत !

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. स्वतःचा देह (नखे, केस आणि त्वचा), तसेच वापरातील

वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

७. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

८. कलेचे सात्त्विक सादरीकरण होण्यासाठी संशोधन

९. २०.९.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २१५ अन् अन्य ९०६ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

१०. 'सनातन प्रभात'च्या माध्यमातून पत्रकारितेचे कार्य

११. भावी आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदी माध्यमांद्वारे मार्गदर्शन

१२. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ 'भारत गौरव पुरस्कार' देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा - 'www.Sanatan.org'.)**

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।।

– जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

---

# परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

१३.७.२०२२ पासून ‘सप्तर्षी जीवनाडीपट्टी’ वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना ‘सच्चिदानंद परब्रह्म’ ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले, तरी त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधकांनी लिहून दिलेल्या लिखाणात ‘प.पू.’ किंवा ‘परात्पर गुरु’ अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे. F (DrV-Nav)

# अनुक्रमणिका

१. विवाहाचा अर्थ २. विवाहसंस्काराचे महत्त्व १२
३. विवाह कितव्या वर्षी करावा ? १३
४. नोंदणी विवाहापेक्षा धार्मिक विवाह का श्रेयस्कर ? १४
५. विवाह ठरवतांना जन्मकुंडल्या पहाणे २०
६. लग्नपत्रिका सात्त्विक कशी असावी ? २१
७. वधू-वरांचा वेश कसा असावा ? ८. वाग्दान २४
९. विवाहदिनी केले जाणारे काही विधी / कृती २८
१०. विवाहाशी संबंधित काही कृती ४५
११. विवाह सोहळ्याच्या संदर्भात काय टाळावे ? ५०
१२. विवाह सोहळ्यातील प्रत्येक कृतीचे अध्यात्मीकरण करा ! ५६
१३. कार्य पूर्ण झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करा ! ५९
१४. शास्त्रानुसार विवाहाविषयी उपस्थितांच्या प्रतिक्रिया ६०
१५. विवाहसंस्काराच्या उद्देशालाच हरताळ फासणारे शासन ! ६२
卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि इतर ६७**

# मनोगत

जीवनात घडणाऱ्या प्रमुख सोळा प्रसंगी ईश्वराच्या जवळ जाण्यासाठी करावयाचे संस्कार हिंदु धर्माने सांगितले आहेत. त्यांतील सर्वांत महत्त्वाचा 'विवाहसंस्कार'! महागड्या लग्नपत्रिका, ऊंची वेशभूषा, भव्य विवाह कार्यालय, 'बँड', आतषबाजी, कर्णकर्कश संगीत, झगमगाट, जेवणाचा थाटमाट इत्यादी गोष्टी असलेला विवाह म्हणजे 'चांगला विवाह', अशी चुकीची धारणा सध्या समाजात निर्माण झाली आहे. या सर्व धामधुमीत विवाहातील धार्मिक विधी शास्त्रशुद्ध करण्याकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. विवाहाचा खरा उद्देश म्हणजे, दोन जिवांचे भावी जीवन एकमेकांना पूरक अन् सुखी होण्यासाठी ईश्वराचा आशीर्वाद प्राप्त करून घेणे ! यासाठी विवाहविधी धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणेच करणे अत्यावश्यक असते. यासाठीच या लघुग्रंथात विवाहातील काही धार्मिक विधींमागील शास्त्र सांगण्यासह विवाहातील अपप्रकारांवर बोट ठेवतांनाच विवाह आदर्शरित्या कसा संपन्न करावा?', याचे दिशादर्शन केले आहे. लहान-लहान

कृतींद्वारे विवाहाला ‘धर्मप्रबोधक उपक्रम’ कसे बनवू शकतो, हेही या लघुग्रंथावरून लक्षात येईल.

सध्या कुटुंबसंस्थाच नष्ट होण्याचा धोका कसा निर्माण झाला आहे आणि त्याविरोधात हिंदूंनी काय केले पाहिजे, याचेही मार्गदर्शन या लघुग्रंथात केले आहे.

हा लघुग्रंथ वाचून सर्व जण विवाहाकडे ‘धार्मिक संस्कार’, या भावाने पाहोत अन् विवाह सोहळ्याचे पावित्र्य राखोत, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## विवाहसंस्कारातील रूढींविषयी हे लक्षात घ्या !

काही प्रांतांत विवाहविधीच्या वेळी काही कृती रूढींनुसार केल्या जातात. या लघुग्रंथात प्रामुख्याने विवाहसंस्कारातील काही कृतींमागील शास्त्र सांगितले आहे. त्यामुळे अशा रूढींचा उल्लेख या लघुग्रंथात नाही. धर्मशास्त्रानुसार कृती करणे सर्वथा योग्य आहे. रूढींचे पालनही श्रद्धेने केल्यास लाभ होतो. असे असले तरी रूढींचे पालन तारतम्याने करावे.